अति.महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. : अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ ५९९७
दिनांक : ०२/१२/२०२०

-: कार्यालयीन आदेश :-

विषय: कोव्हिड-१९ लॉकडाऊन दरम्यान प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना द्यावयाचे विद्यावेतन व प्रशिक्षण कालावधीची मुदत वाढविणेबाबत.

संदर्भ :
१. आज्ञापत्र जा.क्र.साप्रवि/आस्था/६८२४, दि.१३/१२/२०१९
२. आज्ञापत्र जा.क्र.साप्रवि/आस्था/७६८४, दि.१४/०१/२०२०
३. मा. कौशल विकास और उद्यमशीलता मंत्रालय, नवी दिल्ली, दि.३०/०३/२०२० चे कार्यालयीन निवेदन.
४. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/४१४ दि.२४/११/२०२०

दि. अॅप्रेंटीस अॅक्ट १९६१ व १९९६ नुसार पुणे महानगरपालिकेत दरवर्षी एकूण २२ ट्रेडच्या शिकाऊ उमेदवारांची (अॅप्रेंटीसशिपसाठी) शैक्षणिक अर्हतेनुसार व निश्चित करून दिलेल्या पदांचे संख्येनुसार नेमणूक केली जाते.

मा. कौशल विकास और उद्यमशीलता मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील कार्यालयीन निवेदनान्वये लॉकडाऊनचे कालावधित संबंधित आस्थापनांनी प्रशिक्षण घेणाऱ्या सर्व शिकाऊ उमेदवारांना दरमहा द्यावयाचे विद्यावेतन अदा करणेबाबत व लॉकडाऊन करण्यात आल्यामुळे प्रशिक्षणासाठी उपस्थित राहू शकले नाही अशा शिकाऊ उमेदवारांचा लॉकडाऊन मधिल प्रशिक्षण कालावधी वाढविणेबाबत संदर्भ क्र.३ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

सन २०१९-२०२० चे सत्रासाठी एकूण ५७ शिकाऊ उमेदवार संदर्भ क्र.१ व २ आज्ञापत्रकात नमूद केलेल्या संबंधित विभागात हजर झाले आहे. त्यापैकी ४ शिकाऊ उमेदवारांनी प्रशिक्षणाचा राजीनामा दिला आहे. उर्वरित ५३ शिकाऊ उमेदवारांपैकी ४६ शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणास हजर असून ७ शिकाऊ उमेदवार हजर नसल्याबाबत खात्याकडून माहिती प्राप्त झालेली आहे.

त्यानुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी मा.महापालिका आयुक्त यांचे संदर्भ क्र.४ चे ठरावान्वये खालील प्रमाणे मान्यता प्राप्त झालेली आहे.

१. पुणे महानगरपालिकेत प्रशिक्षण घेणारे जे शिकाऊ उमेदवार भारत सरकारद्वारे दि.२३/०३/२०२० पासून लॉकडाऊन करण्यात आल्यामुळे प्रशिक्षणासाठी उपस्थित राहू शकले नाही अशा शिकाऊ उमेदवारांचे लॉकडाऊन कालावधी दि.२३/०३/२०२० पासून ते दि.२०/०९/२०२० पर्यंत लॉकडाऊन कालावधि असल्याचे ग्राह्य धरणे.
२. लॉकडाऊन कालावधित सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-ब मधिल ५१ शिकाऊ उमेदवारांपैकी ३८ शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षणासाठी उपस्थित राहता आले नाही. असे शिकाऊ उमेदवार प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी उपस्थित झालेनंतर, लॉकडाऊन कालावधितील परिशिष्ठ-ब मधिल रकाना क्र.१४ वर नमूद केलेल्या गैरहजर दिवसाप्रमाणे जास्तीत जास्त ६ महिने माहेचे (१८० दिवसांचे) विद्यावेतन अदा करणे.